दै.बीड
www.beedsuperfast.com

# सुपरफास्ट

● संपादक : अतुल शंकरराव जाधव ●

● beedsuperfastgmail.com ●

■ बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ ■ अंक १०३ ■ शुक्रवार दि. १७ एप्रिल, २०२६ ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ पाने ४ ■ किंमत ४ रु.

■ BEED (Maharashtra) ■ Year-4 ■ Issue-103 ■ Friday 17 April, 2026 ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ Pages 4 ■ Price 4

## सीबीएससी बोर्ड परीक्षेत नाथ व्हॅली स्कूलचा राजवीर युधाजित पंडित ९५ % गुणाने उत्तीर्ण



गेवराई (प्रतिनिधी): नुकत्याच झालेल्या सीबीएससी बोर्डाच्या इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाला असून छत्रपती संभाजीनगर येथील नाथ व्हॅली स्कूल मधून राणा राजवीर युधाजित पंडित हा ९५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाला आहे. या यशाबद्दल माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी त्याचे अभिनंदन करून कौतुक केले. छत्रपती संभाजीनगर येथील नाथ व्हॅली स्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या राणा राजवीर पंडित याने तीन विषयांमध्ये पैकीच्या पैकी गुण घेऊन सीबीएससी बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुणाने उत्तीर्ण होत आपल्या कुशाग्र बुद्धीचे चुणूक दाखवली आहे. राणा राजवीर पंडित हे बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित आणि शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या सचिव सौ अनुरुपाताई पंडित यांचे चिरंजीव तर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सौ गिरीका भाभी पंडित यांचे नातू आणि युवानेते यशराज पंडित यांचे पुतणे आहेत. सीबीएससी बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुण घेऊन घवघवीत यश मिळवल्याबद्दल अनेकांनी राणा राजवीर पंडित यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करत, पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# खरीप हंगाम नियोजनासाठी प्रशासन सज्ज व्हावे; बियाणे अन् खतांचा काळाबाजार रोखा

## केज,अंबाजोगाई आढावा बैठकीत आ.नमिता मुंदडा यांचे निर्देश



**केज/अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची कोणतीही अडवणूक होऊ नये आणि त्यांना आवश्यक सोयीसुविधा वेळेत मिळाव्यात, यासाठी प्रशासन स्तरावर जय्यत तयारी करण्याचे निर्देश आमदार नमिता मुंदडा यांनी दिले आहेत. केज व अंबाजोगाई येथे आयोजित तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. भारतीय हवामान विभागाने २०२६ सालासाठी सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवल्याने, या बैठकीत नियोजनावर विशेष भर देण्यात आला. याप्रसंगी केज येथे महाडीबीटी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व इतर कृषी साहित्याचे वाटपही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. बैठकीत मार्गदर्शन करताना आमदार मुंदडा यांनी स्पष्ट केले की, कमी पावसाच्या शक्यतेमुळे हवामान विभाग आणि जागतिक हवामान संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पेरणीचे नियोजन करण्याबाबत गावोगावी प्रभावी जनजागृती करणे आवश्यक आहे. खरीप हंगामात दर्जेदार बियाणे आणि खतांचा पुरेसा साठा उपलब्ध राहील याची खात्री प्रशासनाने करावी. बियाण्यांचा काळाबाजार, अनधिकृत साठा किंवा खतांच्या खरेदीत होणारी लिंकिंगची सक्ती रोखण्यासाठी कृषी विभागाने कठोर पावले उचलावीत, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. तसेच शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळताना येणाऱ्या अडचणी दूर करून, विलंब लावणाऱ्या बँकांवर कारवाई करण्याचे संकेतही त्यांनी दिले आहेत. शेतकरी कल्याणाच्या विविध योजनांचा आढावा घेताना त्यांनी गोपीनाथ मुंडे अपघात विमा, कृषी सोलर पंप आणि पीक विमा यांसारख्या योजना प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. खरीप २०२५ चा प्रलंबित विमा शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी आणि विमा ट्रिगरमधील बदलांबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे ग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी आयडीमधील त्रुटी दुरुस्त करणे आणि महाडीबीटी अंतर्गत प्रलंबित अनुदान त्वरित वितरित करण्याबाबत त्यांनी यंत्रणेला सतर्क केले. शेतीसाठी अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासोबतच पोकरा आणि जलसंधारण योजनांच्या माध्यमातून केळी व रेशीम लागवडीस प्रोत्साहन देण्यावर त्यांनी भर दिला. या बैठकीस तहसीलदार,नायब तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि विविध विभागांचे कर्मचारी उपस्थित होते. सर्व शेतकरी बांधवांना आगामी हंगामासाठी शुभेच्छा देत, प्रशासनाने समन्वयाने काम करावे अशी अपेक्षा आमदार मुंदडा यांनी व्यक्त केली.

# विधानपरिषदेच्या ९ जागांचे बिगुल वाजले

### १२ मे रोजी मतदान अन् निकाल होणार जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधान परिषदेच्या आणखी ९ जागांसाठी निवडणुकीची घोषणा झाली असून, राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा हालचालींना वेग आला आहे. निवडणूक आयोगाने हा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी १२ मे रोजी मतदान होणार असून, त्याच दिवशी मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे. मतदानाची वेळ सकाळी ९ ते दुपारी ४ अशी निश्चित करण्यात आली आहे. यामुळे अनेकांनी लॉबिंग सुरू केले आहे. या ९ जागांवरील विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपणार असल्यामुळे ही निवडणूक आवश्यक ठरली आहे. सध्या राज्यात बारामती आणि राहुरी येथे पोटनिवडणुका देखील होत आहेत, त्यामुळे एकूणच राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विधानसभेतील विद्यमान संख्याबळ लक्षात घेता, या ९ जागांपैकी भाजपला सुमारे ५ जागा मिळण्याची शक्यता आहे. शिवसेनेला २, राष्ट्रवादी काँग्रेसला १ आणि महाविकास

» पान २ वर



### या ९ आमदारांचा कार्यकाळ संपतोय


**ज्या ९ सदस्यांचा कार्यकाळ संपत आहे, त्यामध्ये उद्धव ठाकरे, नीलम गोऱ्हे, शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, गोपीचंद पडळकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजेश राठोड, प्रवीण दटके आणि रमेश कराड यांचा समावेश आहे.**

# स्वाराती रुग्णालयात सुरक्षा समितीची विशेष आढावा बैठक

### रुग्ण आणि नातेवाईकांशी सौम्य वागणुकीचे सुरक्षा रक्षकांना सक्त आदेश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यासाठी गुरुवारी (दि.१६) रुग्णालय सुरक्षा समितीच्या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांना रुग्णांच्या नातेवाईकांशी सौजन्याने वागण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या असून, अरेरावीचे प्रकार अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत,



असा स्पष्ट इशारा रुग्णालय प्रशासनाने दिला आहे. या बैठकीस उपअधिष्ठाता डॉ. राजेश कचरे, अधीक्षक डॉ. राकेश जाधव, पत्रकार अभिजीत गाठाळ, डॉ. नागेश अब्दागिरे, मार्ड संघटनेचे पदाधिकारी, सुरक्षा अधिकारी बी.डी. चिकाळकर यांच्यासह महाराष्ट्र सुरक्षा बलाचे सर्व सुरक्षा रक्षक उपस्थित होते. रुग्णालयाच्या सुरक्षा समितीची प्रत्येक महिन्याला बैठक होत असते. मात्र अलीकडच्या काळात घडलेल्या काही वादग्रस्त घटना आणि सुरक्षारक्षकांकडून होणाऱ्या कथित अरेरावीच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ही विशेष आढावा बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत वैद्यकीय अधीक्षक डॉ. राकेश जाधव यांनी उपस्थित सर्व सुरक्षारक्षकांना त्यांच्या दैनंदिन कर्तव्याची आणि जबाबदारीची जाणीव करून

» पान २ वर

# तीन जिल्ह्यातून हद्दपार असलेल्या तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**माजलगाव । प्रतिनिधी**

तीन जिल्ह्यांतून दोन वर्षांपासून हद्दपार असलेला तरुण पोलिसांची नजर चुकवून माजलगाव शहरात वास्तव्यास होता. मात्र त्यांने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी घडली आहे. याप्रकरणी माजलगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. आत्महत्येचे कारण मात्र अद्याप गुलदस्त्यात असून पोलीस अधिक तपास करीत आहेत. बीड, जालना आणि परभणी जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आलेला अशोक वसंत मंदे (वय १९ वर्ष) या तरुणाने माजलगाव येथील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे पोलीस अधीक्षकांनी त्याला जिल्ह्याबाहेर राहण्याचे आदेश दिले होते, मात्र आदेशाचे उल्लंघन करून तो माजलगावमध्येच वास्तव्य करत होता. १३ एप्रिल रोजी दुपारी त्याने घरातील लोखंडी अँगलला ओढणीने गळफास लावून आपले जीवन संपवले. या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. माजलगाव पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूसह आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस कर्मचारी गणेश नांगरे यांच्या तक्रारीवरून पुढील तपास सुरू असून या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

# अनंत अडचणींवर मात करीत ठोंबरे दांपत्याने केले स्वप्न साकार



## लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुत गिरणी सुरु; पहिला लॉट इचलकरंजी बाजारपेठ दाखल

**बीड । प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासून रखडून पडलेला केज तालुक्यातील प्रकल्प यशस्वीपणे सुरू झाला आहे. यासाठी अनंत अडचणींवर मात करीत माजी आ. संगीता ठोंबरे आणि शेती शास्त्रज्ञ विजयप्रकाश ठोंबरे यांनी प्रयत्न करुन सुतगीरणीचे स्वप्न सत्यात उतवले आहे. यामुळे अनेक तरुणांच्या हाताला काम मिळणार आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुत गिरणी मध्ये उत्पादित झालेल्या सुताचा पहिला लॉट इचलकरंजी (जि. कोल्हापूर) बाजारात दाखल झाला. याबद्दल ठोंबरे दांपत्याचे अभिनंदन करण्यात येत आहे तर माजी आ. संगीता ठोंबरे यांनी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे. माजी आ. संगीता ठोंबरे या आमदार असताना त्यांनी केज मतदारसंघातील तरुणांच्या

हाताला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष काम मिळावे म्हणून केज तालुक्यात सुत गिरणी या प्रकल्पाला मंजुरी मिळवून आणली त्यास लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुत गिरणी असे नाव दिले. पण यासाठी त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. पण अध्यक्ष माजी आ. संगीता ठोंबरे, उपाध्यक्ष विजयप्रकाश ठोंबरे यांनी अनेक अडचणींवर मात करीत अखेर ही

» पान २ वर



### संचालक आणि कामगारांच्या कष्टाचा विजय – माजी आ. ठोंबरे

**स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांचे स्वप्न आणि महाराष्ट्र सरकार मधील वस्त्रोउद्योग व सामाजिक न्याय विभागातील सर्व मंत्री व अधिकारी यांच्या मार्गदर्शन मुळेच हा प्रकल्प उभा राहू शकला. केज तालुक्याचा कायापालट करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. इचलकरंजी बाजारपेठेत आपल्या गिरणीचे सूत पोहोचणे, हा आमच्या सर्व कामगारांच्या आणि सभासदांच्या कष्टाचा विजय आहे. अशी प्रतिक्रिया माजी आ. संगीता ठोंबरे यांनी व्यक्त केली.**

# उद्याच्या मुस्लिम आरक्षण मोर्चास मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनचा पाठींबा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमधील मुस्लिम समाजासाठी चे पाच टक्के आरक्षण रद्द करण्याच्या महायुती सरकारच्या निर्णयाविरोधात उद्या १७ एप्रिल रोजी बीडमध्ये भव्य मोर्चा सकल मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला आहे,देवेंद्र फडणवीस सरकारने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिमांसाठी पाच टक्के आरक्षण रद्द केले होते हे आरक्षण २०१४ च्या कायद्यान्वये देण्यात आले होते, ज्याला आधीच कायदेशीर स्थगिती देण्यात आली होती, परंतु सध्याच्या सरकारने ते पाच टक्के आरक्षण रद्द केले होते! राज्य सरकारने रद्द केलेल्या पाच टक्के मुस्लिम आरक्षणाच्या



निर्णयाविरोधात तीव्र संताप व्यक्त करत, राज्यभर व्यापक आंदोलन उभारण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. तसेच बीड येथे उद्या मुस्लिम आरक्षण कृती समितीने मोठ्या ताकतीने किल्ला मैदान ते जिल्हा अधिकारी कार्यालय बीड येथे भव्य एल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी सर्व समाज बांधवांनी मोर्च्यात मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अरफात खान यांनी केले आहे

# मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चात सहभागी व्हा – शेषेराव तांबे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन करत, सकल मुस्लिम समाजाच्या वतीने उद्या दि.१७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या एलगार मोर्चा स जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. या पार्श्वभूमीवर अठरापगड जाती-धर्मातील नागरिकांनी न्याय हक्कासाठी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.शेषेराव तांबे यांनी सांगितले की, हा मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा वैयक्तिक

» पान २ वर

# मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चास रा.काँ.पार्टी ( श.प.) पदवीधर संघटनेचा पाठिंबा – प्रा. अमर शेख

**बीड । प्रतिनिधी**



बीड येथे उद्या होणाऱ्या सकल मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या एल्गार मोर्चास समाजहित डोळ्यासमोर ठेवून जाहीर पाठिंबा देत असल्याचं पत्र राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा.अमर शेख यांनी मुस्लिम आरक्षण कृती समितीकडे पाठवून, मुस्लिम समाजाने या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, बीडमध्ये उद्याच्या १७ तारखेला मुस्लिम समाजाला मुख्य शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांचे मागासलेपण दूर करण्यासाठी शैक्षणिक ,सामाजिक आणि नोकरीमध्ये आरक्षण अत्यावश्यक आहे, ते आरक्षण पुन्हा

» पान २ वर

# मुस्लिम आरक्षण मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हा - हाफेज मन्सुर तय्यिबी

**बीड । प्रतिनिधी**

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण हा काळाची गरज बनला असून, येणाऱ्या पिढीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी १७ एप्रिल रोजी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या मुस्लिम एल्गार आरक्षण मोर्चात सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन हाफेज मन्सुर तय्यिबी यांनी केले आहे.



यावेळी बोलताना हाफेज मन्सुर तय्यिबी म्हणाले की, हा मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा वैयक्तिक स्वार्थाचा नसून संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय्य हक्कासाठी आहे. शिक्षण, नोकरी आणि विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही समाजाची जुनी व रास्त मागणी आहे. समाजातील अनेक तरुण आजही संधीअभावी मागे राहत

» पान २ वर



# भारत होतोय उपचार पद्धतींमधील महाशक्ती

जागतिक औषधनिर्माण परिदृश्यात जैविक औषधे, बायोसिमिलर्स आणि विशेष औषधांचा वाटा आता औषधनिर्माण महसुलाच्या ४० टक्क्यांहून अधिक आहे. जेनेरिक औषध उत्पादनामधील नेतृत्त्वामुळे दीर्घकाळापासून 'जगाचे औषधालय' म्हणून ओळखला जाणारा भारताचा औषधनिर्माण उद्योग आता व्याप्तीकडून नवोन्मेषाकडे वेगाने वाटचाल करत आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मांडलेल्या १० हजार कोटी रुपये खर्चाच्या बायोफार्मा शक्ती या उपक्रमाची घोषणा म्हणजे या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यातूनच येत्या ८ ते १० वर्षांत जैवऔषधनिर्मिती मधील नवोन्मेष आणि जास्त परिणामकारक आणि किफायतशीर औषधोपचारांचे एक प्रमुख जागतिक केंद्र म्हणून उदयाला येण्याचा भारताचा निर्धार स्पष्ट होतो. ही दूरदृष्टी सखोल वैज्ञानिक क्षमता निर्मिती, नवोन्मेष आधारित उद्योगांना चालना आणि पुढील पिढीतील वैद्यकशास्त्रात भारताला एक अग्रणी म्हणून आपले स्थान मजबूत करण्यासाठी आवश्यक दृष्टिकोन प्रदान करेल. जैविक औषधे आणि बायोसिमिलर्स तसेच प्रगत परिणामकारक आणि किफायतशीर औषधोपचारांना अधिकाधिक चालना देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. हे औषधनिर्माण विभाग, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग आणि जैवतंत्रज्ञान विभागाच्या विद्यमान उपक्रमांना पूरक असून त्यामध्ये जैवऔषधांसह जीवन विज्ञान क्षेत्रातील संशोधन आणि विकासाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुरु केलेल्या 'फार्मा मेडटेक क्षेत्रातील संशोधन आणि नवोपक्रमाला प्रोत्साहन ', 'संशोधन विकास आणि नवोपक्रम योजना', 'बायोनेस्ट' इत्यादींसारख्या योजनांचा समावेश आहे. एकंदरीत हे सर्व उपक्रम भारताच्या नवोन्मेष परिसंस्थेला बळकट करणे, उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील सहकार्य दृढ करणे आणि जेनेरिक औषधांपासून ते नवोन्मेष आधारित औषध शोध आणि विकासाकडे संक्रमण सक्षम करण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. या धोरणातील एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणजे फर्मेंटेशन-आधारित उत्पादन क्षमतांचा विकास करणे हा आहे. अँटीबायोटिक्स, लसी, एन्झाइम्स आणि इतर जैव-औषधे तयार करण्यात हा विभाग खूप महत्त्वाचा असूनही, तो खूप काळापासून आयातीवर अवलंबून आहे. पायाभूत सेवा सुविधांमध्ये गुंतवणूक करुन तंत्रज्ञानाचा विकास आणि हस्तांतरण साध्य करुन आणि उद्देश केंद्रीत प्रोत्साहन प्रदान करुन भारत या महत्त्वपूर्ण क्षेत्रात देशांतर्गत क्षमता विकसित करण्याबरोबरच जागतिक स्पर्धात्मकतेत वृद्धी करण्यासाठी प्रयत्नशील आहे. भारताच्या वैद्यकीय संशोधन परिसंस्थेचा विस्तारही तितकाच महत्त्वाचा आहे. उभारण्यात येणाऱ्या एक हजार मान्यताप्राप्त क्लिनिकल ट्रायल साइट्समुळे जागतिक औषध विकास केंद्र म्हणून भारताची प्रतिमा लक्षणीयरीत्या उंचावेल. किफायतशीर दर आणि कुशल संशोधकांच्या वाढत्या प्रमाणामुळे भारत अत्यंत प्रभावी आणि उच्च दर्जाच्या क्लिनिकल ट्रायलसाठी अगणित संधी प्रदान करणार आहे. त्यासोबतच नियामक चौकटीचे बळकटीकरण आणि संस्थात्मक क्षमतांमधील वृद्धीमुळे भारताला जागतिक मापदंडांशी सुसंगत कामगिरी करणे शक्य होईल, जलदगती मान्यता आणि जागतिक हितधारकांमध्ये विश्वास वाढीला लागेल. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन आणि बल्क ड्रग पार्क अशा योजनांच्या मदतीने सक्रिय औषधनिर्माण घटक आणि प्रमुख कच्चा माल यांचे देशांतर्गत उत्पादन जलद गतीने वाढवले आहे. यामुळे देशातील औषधांच्या किंमती कमी झाल्या असून त्या जगातील सर्वात कमी आहेत, त्यामुळेच नागरिकांना आरोग्यसेवा अधिक किफायतशीर दरात प्राप्त होणे शक्य झाले. प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी योजनेमुळे स्वस्त दरात चांगल्या दर्जाच्या जेनरिक औषधांची उपलब्धता वाढली आहे. १९ हजार पेक्षा जास्त जनऔषधी केंद्रांमधून लाखो लोकांना सेवा दिली जाते. कर्करोग आणि दुर्मिळ आजारांवरील औषधांसारख्या महत्त्वपूर्ण उपचारांवरील सीमा शुल्काचे सुसूत्रीकरण यांसारख्या पूरक उपायांमुळे, जीवनरक्षक उपचारांची उपलब्धता आणखी सुधारत आहे. प्रगत उपचारपद्धती जसजशा अधिक व्यापक होत जातील, तसतसे त्या परवडणाऱ्या दरात उपलब्ध होतील आणि सर्वांना समान संधी मिळेल हे सुनिश्चित करणे, हे एक प्रमुख धोरणात्मक प्राधान्य राहील. जसजसे उद्योगक्षेत्र बदलत आहे, भारत सुस्थापित बाजारपेठेतच नव्हे तर विशेषतः नवोन्मेष आधारित क्षेत्रांमध्येही आपले अस्तित्त्व अधिक ठळकपणे विस्तारण्याच्या प्रयत्नात आहे. सर्व धोरणे या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी आहेत. नियामक सुसूत्रीकरण, मंजुरी प्रक्रियेचे डिजिटलायझेशन आणि जलद मंजुरी या प्रयत्नांमुळे व्यवसाय सुलभता सुधारत आहे. गुणवत्ता मानके आणि नियामक प्रक्रिया अधिक मजबूत करणे या दोन गोष्टींमुळे भारताच्या औषधनिर्माण उत्पादनांमधील जागतिक विश्वास वाढीला लागत आहे. मात्र संशोधन आणि विकासाकरता लागणारी सातत्यपूर्ण गुंतवणूक हे एक प्रमुख आव्हान ठरत आहे. यावर मात करुन दीर्घकालीन संशोधन कायम पुढे नेण्यासाठी सार्वजनिक-खाजगी क्षेत्रातील सहकार्य अधिक मजबूत करणे गरजेचे आहे. भविष्यात डोकावताना, धोरणात्मक पाठिंबा, तांत्रिक प्रगती आणि बाजारपेठेतील संधी यांनी औषधनिर्माण क्षेत्रासाठी वृद्धीची वैशिष्ट्यपूर्ण कवाडे खुली केली आहेत. भारताची देशांतर्गत बाजारपेठ आधीच चार लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याची असून, ती पुढेही सातत्याने वाढणार आहे. येत्या दशकात भारत केवळ 'जेनेरिक' औषधांमध्येच नव्हे, तर नावीन्यपूर्ण औषधे, फर्मेंटेशन आधारित उत्पादने आणि पुढील पिढीच्या उपचार पद्धतींमध्येही एक मोठी शक्ती म्हणून उदयास येण्यासाठी सुस्थितीत आहे. सारांश, भारताचे औषधनिर्माण क्षेत्र, नवोन्मेष, लवचिकता आणि जागतिक स्पर्धात्मकतेच्या एका नवीन वैशिष्ट्यपूर्ण टप्प्यात प्रवेश करत आहे. बायोफार्मा शक्ती कार्यक्रम, सतत विस्तारणारी वैद्यकीय पायाभूत सेवासुविधा आणि उद्दिष्ट केंद्रीत उत्पादन प्रोत्साहन यांसारख्या उपक्रमांच्या पाठबळावर, भारत सातत्याने मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या जेनेरिक औषधांच्या केंद्राकडून उच्च मूल्याच्या जैवऔषध नवोन्मेषातील अग्रणी देशाकडे स्थिरपणे स्थित्यंतर करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील विकसित भारत २०४७ अंतर्गत जागतिक आरोग्यसेवा आणि व्यापक उद्दिष्टांमध्ये भारताची भूमिका मजबूत करण्यासाठी हे परिवर्तन केंद्रस्थानी असेल.



**भारतरत्न बोधिसत्व, शिल्पकार महामानव, विश्वरत्न, घटनाकार, ज्ञानसूर्य, ज्ञानाचे दिपस्तभ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ जयंती लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि. सुंदरनगर कार्यालयात साजरी करण्यात आली यावेळी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड समवेत श्री. अशोक पाटील, दासराव मोरे, विष्णु मोरे, सतोष लगड, दशरथ सहजराव, बाळु सावंत, दत्ता शेवाळे धनंजय सोळंके.**

## चेक बाउन्स प्रकरणात शेख जुनेद बागवान दोषी; न्यायालयाकडून दंड व कारावासाची शिक्षा

**बीड | प्रतिनिधी**

कर्जफेडीसाठी दिलेला धनादेश वटला नाही आणि नोटीस देऊनही रक्कम परत न केल्याच्या प्रकरणात शेख जुनेद शेख शहाबुद्दीन बागवान (रा. शहेनशाह नगर, बीड) यास न्यायालयाने दोषी ठरवत दंड व कारावासाची शिक्षा सुनावली आहे. हा निकाल दि. १३ एप्रिल २०२६ रोजी माननीय अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, बीड यांनी दिला. या प्रकरणात फिर्यादी रामकृष्ण अर्बन मल्टीपर्पज निधी लिमिटेड, बीड यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने व्यवसाय वाढीसाठी सुमारे एक लाख रुपयांचे वैयक्तिक कर्ज घेतले होते. मात्र ठरलेल्या अटींनुसार परतफेड न केल्याने खाते थकबाकीत गेले. वारंवार पाठपुरावा केल्यानंतर आरोपीने दि. १ जून २०२३ रोजी १,०७,६५० रुपयांचा धनादेश दिला. हा धनादेश बँकेत जमा केल्यानंतर संबंधित खाते क्लिअरिंगमध्ये नसल्यामुळे परत आला. त्यानंतर फिर्यादीकडून कायदेशीर नोटीस पाठवूनही आरोपीने रक्कम परत केली नाही. त्यामुळे निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत तक्रार दाखल करण्यात आली. सुनावणीदरम्यान फिर्यादी व आरोपी या दोघांची साक्ष नोंदवून युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवले. न्यायालयाने आरोपीस १,२५,००० रुपयांचा दंड ठोठावला असून, दंड न भरल्यास चार महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात फिर्यादीतर्फे ॲड. सचिन अंबादासराव आबुज यांनी काम पाहिले असून त्यांना ॲड. पूजा जाधव व ईशान रासकर यांनी सहकार्य केले.



## पान १ आणि ४ वरुन...

## पान १ आणि ४ वरुन...

### स्वाराती रुग्णालयात सुरक्षा...

दिली. रुग्णालयाच्या आवारात गर्दी नियंत्रित करणे आणि शिस्त राखणे हे मुख्य काम असले तरी, ते करताना सुरक्षारक्षकांनी संयम बाळगणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असली तरी प्रत्येक नातेवाईक हा आपल्या रुग्णाच्या काळजीमुळे आधीच तणावात असतो, त्यामुळे त्यांच्याशी विनाकारण वाद घालण्याऐवजी परिस्थिती शांततेत हाताळावी आणि कोणत्याही सुरक्षारक्षकाने कायदा स्वतःच्या हातात घेऊ नये, अशी स्पष्ट समज डॉ. जाधव यांनी दिली. रुरुग्णालयात येणारा रुग्ण आणि त्याचे नातेवाईक हे प्रामुख्याने ग्रामीण भागातील आणि अत्यंत गरीब कुटुंबातील असतात. ते आधीच संकटात आणि तणावाखाली असतात, अशा वेळी त्यांच्याशी सौजन्याने आणि आदराने वागणे हे सुरक्षारक्षकांचे आद्य कर्तव्य आहे, अशी समज उपअधिष्ठाता डॉ. राजेश कचरे यांनी सुरक्षा रक्षकांना दिली. सध्याच्या काळात प्रत्येक लहान-मोठ्या घटनेचे मोबाईलवर चित्रीकरण होऊन ते लगेचच समाजमाध्यमांवर व्हायरल होते, ज्यामुळे संस्थेची आणि रुग्णालयाची प्रतिमा जनमानसात मलिन होते. त्यामुळे सुरक्षारक्षकांनी सार्वजनिक ठिकाणी आपले वर्तन अत्यंत जबाबदारीचे ठेवावे. यापुढे जर काही वाद निर्माण झालाच, तर सुरक्षारक्षकांनी स्वतः कायदा हातात न घेता तातडीने पोलिसांची मदत घ्यावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. याप्रसंगी पत्रकार अभिजीत गाठाळ यांनीही माध्यमांची आणि जनतेची बाजू मांडली. ग्रामीण भागातून आलेल्या रुग्णांना रुग्णालयाची सर्व माहिती नसते, अशावेळी सुरक्षा रक्षकांनी त्यांच्यावर ओरडण्याऐवजी त्यांना व्यवस्थित मार्गदर्शन करावे. रुग्णालयाची प्रतिमा उंचावण्यासाठी आणि सामान्य रुग्णांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन अभिजीत गाठाळ यांनी या प्रसंगी केले.

### विधानपरिषदेच्या...

आघाडीला १ जागा मिळू शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, राष्ट्रवादीकडे अतिरिक्त १३ मते असल्यामुळे जर महायुतीने अतिरिक्त उमेदवार उभा केला, तर ही निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बिनविरोध निवड होण्याची शक्यता कमी मानली जात आहे. जे आमदार होण्यासाठी इच्छुक आहेत त्यांनी आता पक्षाकडे लॉबिंग सुरू केली आहे.

### अनंत अडचणींवर मात...

सुत गिरणी सुरू केली. यामुळे अनेक तरुणांच्या हाताला काम मिळाले आहे. येथे निर्मिती झालेल्या सुताच्या पहिल्या लॉटचा शुभारंभ माजी मंत्री प्रकाश आवाडे, वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोकराव स्वामी, प्रसिद्ध सुताचे व्यापारी अरुण कुमार गोयंका यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी माजी आ. राजेश पाटील, उल्हास सूर्यवंशी,कार्यकारी संचालक अनिल पाखरे व इचलकरंजी शहरातील अनेक उद्योजक उपस्थित होते. पहिला लॉट इचलकरंजी येथील बाजार पेठेत दाखल झाला आहे. या सुत गिरणीमुळे परिसरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

### मुस्लिम आरक्षण मोर्चात...

आहेत. त्यामुळे आपल्या मुला-बाळांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा लढा आवश्यक आहे.ते पुढे म्हणाले की, आज जर आपण एकजुटीने उभे राहिलो नाही तर येणाऱ्या काळात आपल्या पुढील पिढ्यांना संधींपासून वंचित राहावे लागू शकते. म्हणून प्रत्येक तरुण, ज्येष्ठ नागरिक, महिला व समाजातील सर्व घटकांनी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून या मोर्चात सहभागी व्हावे.

ही वेळ एकत्र येण्याची आहे, मतभेद विसरून समाजहितासाठी खांद्याला खांदा लावून उभे राहण्याची आहे. आपल्या हक्कासाठी शांततेच्या मार्गाने आवाज उठविणे हीच खरी ताकद आहे, असेही त्यांनी सांगितले.१७ एप्रिल रोजी बीड येथे होणारा मुस्लिम एल्गार आरक्षण मोर्चा यशस्वी करून मुस्लिम समाजाची एकजूट राज्याला दाखवून द्यावी, असे आवाहनही हाफेज मन्सुर तय्यिबी यांनी शेवटी केले

### मुस्लिम आरक्षण एल्गार...

मिळविण्यासाठी मुस्लिम समाजातील युवक पुढाकार घेत असून त्याना सर्वपक्षीय नेत्यांकडून पाठबळ मिळत आहे, ही कौतुकास्पद बाब असून आरक्षण मिळेपर्यंत हा लढा अधिक तीव्र करून तो बीडपासून संपूर्ण महाराष्ट्र भर करणे गरजेचे आहे, त्याचसाठी सकल मुस्लिम आरक्षण समितीच्या मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चास मी एक जबाबदार शैक्षणिक प्रतिनिधी म्हणून माझ्या पक्षाच्या संघटनेच्या वतीने माझा जाहीर पाठिंबा देत आहे तसेच हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न करावा असे आवाहन करतो असे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. अमर शेख यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे केले आहे.

### मुस्लिम आरक्षण एल्गार...

स्वार्थासाठी नसून तो संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय हक्कासाठी आहे. समाजातील शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण दूर करण्यासाठी शिक्षण, नोकरी तसेच विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही दीर्घकाळापासूनची व न्याय्य मागणी असल्याचे त्यांनी नमूद केले.

पुढील पिढीचे भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी हा लढा आवश्यक असून, या ऐतिहासिक आंदोलनात सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी कले

### मुस्लिम आरक्षण मोर्चाला...

निर्माण झाली होती. सत्ता बदल होताच कसले आरक्षण आणि कोण मुस्लिम समाज अशी भाषा पाशा पटेलसह भाजपाच्या नेत्यांकडून ऐकण्यात आली होती. आजतागायत समाजाबद्दल बेताल वक्तव्ये करण्यात येत आहेत. व या मोबदल्यात पाशा पटेलला विधान परिषद केंद्रीय कृषी आयोग अध्यक्षपद भेटले समाजाला टाकलं चुलीत तसे आताही होऊ नये.

आरक्षण मोर्चा काढणारे कोणत्या नेत्याचे किंवा पक्षाचे कार्यकर्ते आहेत, हेही समाजाला माहित होणे गरजचे आहे कारण संयोजक हे नगरचे खासदार निलेश लंके यांचे पी ए का कार्यकर्ते आहे अशी लोकांमध्ये शहरात चर्चा आहे यासाठी संयोजकांनी आपला सामाजिक उद्देश व राजकीय भूमिका स्पष्ट करावी. अन्यथा भोळाभाबळा गरीब समाज कोणत्याही अफवेला भावनिक बळी पडतो, तसे होता कामा नये.मुस्लिम आरक्षण आंदोलन ही कुणाची मक्तेदारी किंवा जागीर नाही. कोणीही समाजाच्या विषयावर आंदोलने करू शकतो; परंतु हे आंदोलन मागण्या मान्य होईपर्यंत निरंतर चालावे. मी लोटांगणे घालणारा किंवा मलीदा लाटणारा नेता नसून समाजाच्या वतीने नेत्यांना आरसा दाखवणारा कार्यकर्ता आहे. मी स्वतः २० डिसेंबर २०१६ च्या मोर्चावेळी मोर्चा संयोजक होतो व मौलाना बदरुद्दीन अजमल साहेबांच्या यूडीएफ पक्षाचा जिल्हाध्यक्ष होतो. परंतु मी पक्षाचा राजीनामा देऊन मुस्लिम आरक्षण आंदोलन उभे केले होते. आज लोकसेना संघटना ही फक्त सरकार, प्रशासन व सत्ताधारी राजकीय नेत्यांवर दबाव निर्माण करण्यासाठी आणि नव्याण्णव टक्के समाजकारण करण्यासाठी स्थापन केलेली संघटना आहे.

### चेक बाऊन्स प्रकरणातील...

फिर्यादी यांना दिला व सदरचा धनादेश बँकेत वटेल व फिर्यादीस त्याची आरोपीकडे असणारी रक्कम त्यास मिळून जाईल असा शब्द,आश्वासन व भरवसा दिला परंतु सदरचा धनादेश बँकेत वटवण्यासाठी गेला असता सदरचा धनादेश अनादरीत झाला व आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याचे कारणाने परत आला. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपी यांच्या विरोधा मध्ये बीड येथील मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांचे न्यायालयात समरी क्रिमिनल केस ३९८/२०२५ छबन वि शुभम खटाणे असे प्रकरण दाखल केले.सदर प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने प्रकरण आरोपी विरुद्ध चालवून पुरावा व फिर्यादी वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धरून सदर प्रकरणांमध्ये आरोपीने कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रमेंट क्ट प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे आरोपी शुभम खटाणे यांस दोषी धरून तीन लाख रुपये दंड व सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली व सदरचा दंड न भरल्यास आरोपीला तीन महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली.सदर प्रकरणात फिर्यादीच्या वतीने ड.गणेश हनुमंत तावरे यांनी काम पाहिले.

### शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा...

जयदिप औटी, प्रगतीशील शेतकरी कालिदास नवले, बि-बीयाणे व खते विक्रेता संघटनेचे शांतीलाल पिसाळ, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, तहसिलदार संदिप खोमणे, गटविकास अधिकरी अनिरुध्द सानप, तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमात विक्रमी उत्पादन घेणाऱ्या प्रगतीशील शेतकऱ्यांचा सत्कार

करण्यात आला. पोखरा, महाडीबीटी व गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतील लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे मान्यवरांच्याहस्ते वितरण करण्यात आले. याप्रसंगी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, स्व.अजितदादा पवार साहेब यांनी गेवराई तालुक्यातील रेशीम शेतीची दखल घेऊन गेवराई येथे 'रेशीम पार्क' उभारणीसाठी १५ कोटी रुपयांचा निधी मंजुर केला आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी पारंपारीक पिक पध्दतीमध्ये बदल करून रेशीम शेतीसारख्या नफ्याच्या उत्पादनांकडे वळून आपले आर्थिक हित साधले पाहिजे. खरीप पिकांच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे वेळेत आणि सुलभ उपलब्ध होण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, बियाणांची आणि खतांची साठेबाजी करून चढ्या भावाने विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी. फलोत्पादन व भाजीपाला पिके शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये अर्थक्रांती घडवत आहे. यासाठी बाजार समितीने पुढाकार घेऊन गेवराईत कांदा मार्केट सुरु केले असून भविष्यात मोसंबी मार्केट गेवराईत सुरु करणार असल्याचेही आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलताना आ. पंडित म्हणाले की, प्रशासन आणि शेतकरी यांनी समन्वयाने शासनाच्या चांगल्या योजना राबविल्यास शेतकऱ्यांची प्रगती होईल. कृषी विभागाच्या विशेषतः पोखरा सारख्या योजनेतून सिंचन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले पाहिजे, तालुक्यात चाळीस गावांची पोखरा योजनेसाठी निवड झाली आहे. ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी पारदर्शक व सर्वसमावेशक कामे कृषी कर्मचाऱ्यांनी करावीत. फार्मर आयडी दुरुस्तीचा प्रश्न आपण मार्गी लावला असून पीएम किसान मधील पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी सुध्दा प्रयत्न केले आहेत. सुमारे दोन हजार शेतकरी आजही ई-केवायसी मुळे लाभापासून वंचित आहेत. शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी कृषी आणि महसुल कर्मचाऱ्यांनी संयुक्त प्रयत्न करावेत असेही त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन मंडळ कृषी अधिकारी सतिष केसभट यांनी केले. कार्यक्रमात जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, प्रगतीशील शेतकरी कालिदास नवले यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गेवराई तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी माजी सभापती पांडुरंग कोळेकर, माजी उपसभापती विकास सानप, शामराव मुळे, कारखान्याचे संचालक संदिपान दातखीळ, बळीराम साबळे, अरुण चाळक आदी उपस्थित होते.

# जनगणना करताना ओबीसीची पण जनगणना करा : प्रा.सुशीलाताई मोराळे

**बीड । प्रतिनिधी**

**भारत सरकारने विरोधी पक्ष नेता राहुल गांधींच्या वारंवार सभागृहातील मागणीचा विचार करून जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. ही जनगणना करण्यासाठी शासनाकडून पूर्ण तयारी करण्यात आली आहे. ३३ मुद्यांची माहिती बीएलओना भरावी लागणार आहे. परंतु दुर्दैव असे की, १९३१ च्या इंग्रज सरकारने केलेल्या जनगणनेत ओबीसी ची जनगणना झाली होती तेव्हा देशाच्या लोकसंख्येत ५२% ओबीसी असल्याचा अहवाल समोर आला होता. १९४७ ला देश स्वतंत्र झाला त्यानंतर १९५१ ते २०११ पर्यंत देशाने जनगणना केली असली तरी ओबीसींना मोजले गेले नाही. २०११ नंतर २०२१ ला जनगणना होणे अपेक्षित होते परंतु कोविडचे संकटाचे कारण पुढे केले गेले आणि २०२६ एप्रिल पासून ही जनगणना होणार आहे. मात्र त्यात ओबीसी जनगणना होणार नसल्याचे सिद्ध झाले आहे. सरकार ओबीसींना का घेत आहे हे समजू शकलेले नाही. ही जनगणना ओबीसी सहित करावी अशी मागणी ओबीसी बचाव संघर्ष समितीच्या वतीने आपण माननीय प्रधानमंत्री भारत सरकार यांना करीत आहोत.**




दिनांक १३ एप्रिल रोजी माननीय जिल्हाधिकारी बीड यांच्या कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले त्या प्रसंगी जिल्ह्यातील ओबीसी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ७ ऑगस्ट १९९० देशातील जनता दलाच्या सरकार व मित्र पक्षाच्या सरकारने देशातील ५२ टक्के ओबीसींना नोकरी आणि शिक्षण क्षेत्रात सत्तावीस टक्के आरक्षण जाहीर केले. ओबीसी जनगणना व्हावी म्हणून २ ऑक्टोबर २०१३ पर्यंत ही जनगणना करू या मागणीसाठी ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने पाच लाख सह्यांचे निवेदन माननीय प्रधानमंत्री यांना देण्यात आले दिनांक ९ ऑगस्ट ते २ ऑक्टोंबर या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात त हे अभियान संघटनेने राबवले होते. २ ऑक्टोंबर २०११ रोजी देशाच्या संसदेत ओबीसी जनगणनेचा ठरावही मनमोहन सिंग सरकारने पारित केला होता. त्यापूर्वी १९९६ मध्ये देवेगोडा यांच्या नेतृत्वातील जनता दल सरकारने ओबीसी जनगणनेचा ठराव घेतला होता परंतु त्यांचे सरकार पाडण्यात आले आणि हा प्रश्न प्रलंबित राहिला दर दहा वर्षांनी जनगणना व्हायला पाहिजे कारण देशाचे बजेटचे नियोजन करण्यासाठी जनगणना आवश्यक असते. तब्बल १६ वर्षांनी ही जनगणना होत आहे २०११ च्या जनगणने देशाची लोकसंख्या १२१ कोटी पेक्षा जास्त होती त्याच आकड्यानुसार देशाचे बजेट दरवर्षी केले जात आहे. कदाचित हा आकडा आता १५० कोटी होईल वाढत्या लोकसंख्येसाठी पाणी, आरोग्य, शिक्षणाच्या सुविधा त्या प्रमाणात करणे गरजेचे असते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची जनगणना होते त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटची तरतूदही केली जाते मात्र ओबीसीचा नक्की आकडा नसल्यामुळे प्लॅनिंग मध्ये त्यांना स्थान नाही. आजचे केंद्र सरकार व राज्य सरकार दोघांनाही प्रचंड संख्येने मतदान ओबीसी देतात मात्र ओबीसीची जनगणना करायला सरकार तयार नाही. केंद्रात २७ मंत्र्यांसह प्रधानमंत्री मोदी जी ओढून ताणून का होईना ओबीसी आहेत पण उपयोग काय मराठीचा दांडा गोतास काळ असतो. त्या म्हणीप्रमाणे मोदीजी ओबीसी आहेत पण ते मजबूर प्रधानमंत्री आहेत. जोपर्यंत नागपूर संघाचे त्यांचे आक्का त्यांना ओबीसी जनगणना करायला परवानगी देत नाहीत तोपर्यंत मोदीजी मजबूर आहेत. झोपेचे सोंग घेतलेला ओबीसी जनसमुदाय मात्र याबाबत अनभिज्ञ आहे. १९९० ला ३७४३ जाती देशात ओबीसी प्रवर्गात होत्या महाराष्ट्रात ही संख्या २७२ इतकी होती त्यानंतर मंडल आयोगाकडून मोजायच्या राहिलेल्या जाती जागा झाल्या आता संपूर्ण देशात ही संख्या किमान ४५०० इतकी झाली असणार आहे. राज्यात ३५० पेक्षा जास्त ही संख्या आज तारखेला आहे. मराठा समाजातील, जाती फोड जाती कुणबी यांचाही नव्याने समावेश ओबीसी प्रवर्गात झाला आहे. मी जरांगे पाटील साहेबांना नम्र आवाहन करते की केवळ ओबीसी प्रवर्गात समाविष्ट होऊन चालणार नाही त्यासाठी ओबीसीची जनगणना होणे गरजेचे आहे आपण या लढ्याचे नेतृत्व करावे अशी विनंती आम्ही ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने आपणास करीत आहोत. या प्रसंगी श्री कल्याण काका आखाडे, ॲड सुभाष राऊत, बापूराव भालेकर, देविदास चव्हाण, डॉक्टर संजय तांदळे, प्रा. भगवान माने, प्रा. लक्ष्मण गुंजाळ, मीनाक्षी देवकते, अर्जुन दळे, विशाल राऊत, प्रा. बाळासाहेब मतकर, गणेश जगताप, राजेंद्र दराडे, रवी बांगर, संतोष काळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## ह.भ.प. सचिन महाराज सपकाळ यांच्या भागवत कथेचे मन्यारवाडी येथे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे मन्यारवाडी येथे भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ यांच्या संगीतमय भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून. कथेची सुरूवात दि.१५ एप्रिल रोजी तर सांगता दि.२२ एप्रिल रोजी होणार आहे. कथेचा वेळ दुपारी १२ ते ४ असा आहे. या कथेस मातोश्री ह.भ.प. कुसुमताई सपकाळ - गायन, ह.भ.प. माऊली महाराज घुमरे -सिंथ-गायन, ह.भ.प. वसुदेव काजळे- सिंथ-गायन, ह.भ.प. जगन्नाथ महाराज कराळे तबला ह.भ.प. सतीश महाराज कानडे-क्टोपॅड, बालकलाकार राधेश्याम महाराज सपकाळ- ढोलक , ह.भ.प.पवन महाराज सपकाळ- गायन यांची सुरेख संगीत साथ लाभणार आहे.



दि.२२ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत कथेची सांगता व महाप्रसादाचे वाटप होणार आहे. तरी भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ यांच्या अमृततुल्य, मधुर, भक्तीपूर्ण वाणीतून भव्य-दिव्य संगीतमय श्रीमद् भागवत कथा ऐकण्यासाठी मन्यारवाडी - आंबेसावळी व परीसरातील सर्व गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती आयोजक मन्यारवाडी ता.जि. बीड येथील सर्व ग्रामस्थ यांनी केली आहे.

## मिल्लीया महाविद्यालयात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त सलग अठरा तासांचे अभ्यास अभियान




**बीड । प्रतिनिधी**

येथील मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात ग्रंथालयामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सलग अठरा तासांचे अभ्यास अभियान मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी सतत अभ्यास करून आपले भविष्य घडवावे असे आवाहन केले. ग्रंथपाल डॉ.आमेर सलीम यांनी या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाची सवय वाढवणे, सातत्यपूर्ण अभ्यासाची सवय लागावी, एकाग्रता वाढावी, वेळेचे नियोजन कौशल्य विकसित व्हावे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक विचारांची जाणीव करून देणे हा असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी सलग अठरा तास विविध विषयांचा अभ्यास करून या अभियानात सहभाग नोंदविला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने व शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग घेतला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाबद्दलची आवड निर्माण झाली असून, भविष्यात अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.आमेर सलीम यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

### स्वयंपाकघरातील मसाल्यांत दडलंय आरोग्याचं गुपित;

## आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे ‘वनस्पती शिबिर’ उत्साहात

### ३६० नागरिकांनी घेतला लाभ; ८० पेक्षा जास्त औषधी द्रव्यांचे प्रदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या स्वयंपाकघरात रोज वापरले जाणारे जिरे, धने, मिरे आणि हिंग हे केवळ चव वाढवणारे पदार्थ नसून ते आरोग्याचे रक्षक आहेत, हा संदेश 'आदित्य आयुर्वेद महाविद्यालया'च्या वतीने आयोजित शिबिरातून देण्यात आला. आदित्य शिक्षण संस्थेचे संस्थापक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय माध्यमिक विद्यालय, सारडा पार्क येथे शनिवार दि. ११ एप्रिल रोजी 'स्वयंपाकघरातील औषधी वनस्पती' या विषयावर भव्य शिबिर पार पडले. या प्रदर्शनाचा बीडमधील ३६० नागरिकांनी लाभ घेतला. ८० पेक्षा जास्त औषधी द्रव्यांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी भरवले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा तर प्रमुख पाहुणे म्हणून अन्न सुरक्षा अधिकारी अजय गाढे, अंकुश नरवाडे आणि सिद्धार्थ चव्हाण हे उपस्थित होते. त्यांनी अन्न सुरक्षा आणि औषधी वनस्पतींचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य, शाळेच्या मुख्याध्यापिका आणि संस्थेच्या विविध विभागांचे प्राचार्य उपस्थित होते. अंकुश नरवाडे (अन्न सुरक्षा अधिकारी) यांनी बोलताना सांगितले कि,केवळ आजारी पडल्यावर उपचार करण्यापेक्षा,




स्वयंपाकघरातील वनस्पतींचा वापर करून आरोग्य कसे टिकवावे, हे या शिबिराने शिकवले आहे, असे अन्न सुरक्षा अधिकारी सिद्धार्थ चव्हाण म्हणाले. आदित्य शिक्षण संस्थेने अशा सामाजिक उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांशी जोडलेली नाळ ही शहराच्या आरोग्यासाठी अत्यंत आश्वासक आहे. केवळ आजारी पडल्यावर उपचार करण्यापेक्षा, स्वयंपाकघरातील वनस्पतींचा वापर करून आरोग्य कसे टिकवावे, हे या शिबिराने शिकवले आहे, असे अन्न सुरक्षा अधिकारी सिद्धार्थ चव्हाण म्हणाले. आदित्य शिक्षण संस्थेने अशा सामाजिक उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांशी जोडलेली नाळ ही शहराच्या आरोग्यासाठी अत्यंत आश्वासक असल्याचे सिद्धार्थ चव्हाण (अन्न सुरक्षा अधिकारी) यांनी यावेळी नमूद केले. विद्यार्थ्यांचा सहभाग आणि जनजागृती या प्रदर्शनास सुमारे ३६० नागरिकांनी भेट देऊन आरोग्याविषयीची शंकांचे निरसन करून घेतले. महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांनी या शिबिराचे नियोजन आणि माहिती देण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता, प्रत्यक्ष लोकसंवाद साधल्यामुळे व्यवहारी ज्ञानाचाही अनुभव आला. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली, द्रव्यगुण विभागाच्या प्राध्यापिका डॉ. मयुरी शिंदे-करंडे, प्रा. रामेश्वर ढोबळे आणि इतर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले. या उपक्रमामुळे बीड शहरात घरगुती औषधी वनस्पतींबाबत मोठी जागरूकता निर्माण झाली असून, आयुर्वेदाचा वारसा घराघरात पोहोचवण्यास मदत झाली आहे.

## माजलगाव ग्रामीण पोलिसांची धडाकेबाज कारवाई,हातभट्टी दारू चा अड्डा केला उध्वस्त

**पात्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव ग्रामीण पोलिसांची धडाकेबाज कारवाई. मा परी पोलीस अधीक्षक राहुल कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली गावठीव हातभट्टी दारू चा अड्डा केला उध्वस्त मिळालेली माहिती अशी की माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे हद्दीतील ढोरगाव शिवारात कॅनल च्या बाजूला तू माहिती आधारे विनापरवाना बेकायदेशीर रित्या गावठी व हातभट्टी दारू तयार करून विक्री करणाऱ्या आरोपी अनिल लहू गायकवाड याच्यावर माजलगाव ग्रामीण पोलीसनी



कारवाई केली असून ५० लिटर गावठी व हातभट्टी दारू ज्याची अंदाजे किंमत २९००० मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे . संबंधित आरोपी पोलीस अधिकाऱ्यांना बघून पडून गेला असून संबंधित तपास संतोष जेठेवाड यांच्याकडे दिला . हि कारवाई सपोनी देविदास सोनवळे, पोलीस अंमलदार बाबरे, चव्हाण, अडागळे. आदींनी केली.

## जिल्ह्यातील मुस्लिम नेते मुस्लिम लोकांवर शिव्या देणाऱ्या मंत्री, आमदार सोबत आहेत का? : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सध्या मुस्लिम समाजावर मंत्री नितेश राणे, आ. गोपीचंद पडळकर ,संग्राम जगताप, महेश लांडगे हे लोक जातीय तेढ



निर्माण करून जेव्हा वाटेल तेव्हा मुस्लिम समाजाला टार्गेट करीत आहे. तसेच मुस्लिमांना जातीय शिवीगाळ करून मज्जिद समोर जाणून बुजून नाचून मुस्लिम समाजाला त्रास देण्याचे काम करीत आहेत. गृहमंत्री तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस साहेब,आपण यांना सुपारी दिली का काय? हा जनतेच्या मनात पडलेला प्रश्न आहे.आपण एक राज्याचे मुख्यमंत्री तसेच गृहमंत्री आहात. आपली जबाबदारी आहे की, आपण आपल्या राज्यात काय चाललं याच्याकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच जातीय तेढ निर्माण करून महाराष्ट्र पेठविणाऱ्या मंत्री तसेच आमदारांना तंबी दिली पाहिजे.आपणच जर आपल्या मंत्री ला तसेच आमदारांना पाठराखण करीत असाल तर येणाऱ्या निवडणुकीत आपल्याला याचे परिणाम भोगावे लागतील. आपल्याकडून मुस्लिम समाजाची खूप अपेक्षा आहेत. आपण आपल्या मंत्र्यांना आवरा. तसेच बीडच्या पण नेत्यांना माझा सवाल आहे की, आपण त्या मंत्री,आमदार सोबत आहेत की काय? नाहीत ना. मग बीडच्या मुस्लिम समाजाच्या नेत्यांनी एकत्र येऊन मंत्री नितेश राणे, गोपीचंद पडळकर संग्राम, जगताप महेश लांडगे, यांच्यावर गुन्हा दाखल करावा. जिल्ह्यातील सर्व मुस्लिम समाज आपल्या पाठीशी आहे. तुम्ही आवाज द्या .जनता तुमच्या पाठीशी आहे. जर तुमच्या कडून होत नसेल तर मुस्लिम समाजाच्या नेत्यांनी आपापल्या पदाचे राजीनामे द्यावे. आणि घरी बसावे ही जनतेची मागणी आहे.

## मॅपिंग करून घ्या नसता मतदार यादीतून कायमचे नाव वगळले जाणार : प्रा.आंधळे

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक १३ ४ २०२६ बीड जिल्ह्यातील सर्व मतदाराचे मतदार पुनर्नरीक्षण आणि मॅपिंग करण्यासाठी सर्व मतदान केंद्रावर रविवार आणि सोमवार अशा दोन दिवशीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या मोहिमेचा लाभ बीड जिल्ह्यातील सर्व समाजातील नागरिकांनी



घ्यावा असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार जर मतदारांनी आपले मॅपिंग करून घेतले नाही तर त्यांचे नाव मतदार यादीतून कायमचे वगळले जाण्याची शक्यता आहे नाव वगळले गेल्यास भविष्यात सर्व सवलतीपासून वंचित राहावे लागू शकते म्हणून बीड जिल्ह्यातील सर्व मतदार बंधू आणि भगिनींनी आपले मॅपिंग करून घ्यावे असे आवाहन एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे.

## क्रांतिसूर्य महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त

# मोरया रनर्स ग्रुपकडून १० कि.मी अभिवादन दौड

## अभिवादन दौड मधून आरोग्य संदेश व महापुरुषांच्या विचारांचा जागर : अमर नाईकवाडे



**बीड । प्रतिनिधी**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात मोरया रनर्स ग्रुप, बीड यांच्या वतीने रविवार दिनांक १२ एप्रिल रोजी १० किलोमीटर अभिवादन दौडचे आयोजन करण्यात आले होते. या अभिवादन दौड मध्ये सहभागी धावपटूंनी उत्साहपूर्ण वातावरणात दहा किलोमीटरचे अंतर पूर्ण करत महापुरुषांना अभिवादन केले. सामाजिक समता, शिक्षण आणि मानवमुक्तीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या व चांगलं आरोग्य राखण्याच्या उद्देशाने या दौडीचे आयोजन करण्यात आले होते. सदर अभिवादन दौडीला शहरातील विविध क्षेत्रातील युवक धावपटूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. धावपटूंनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करून समाजात बंधुता, समानता आणि शिक्षणाचा संदेश देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला. दहा किलोमीटर अभिवादन दौड मध्ये अमर नाईकवाडे, कपूर अग्रवाल, रमेश सेठ तापडिया, वैजनाथ फुटाणे, प्रदीप घोलप, सागर खांडे, स्वराज घोलप, अक्षय बाफना, अंगद नवले, रवी राऊत, पवन धूत, अशोक मुंडे, महेश लड्डा, दत्ता गाडे, गोपाल म्हात्रे, अक्षय राजमाने, ऋषिकेश सोहनी, अजय लड्डा, विलास खवले, कृष्णा कासट, गोपाल मुंदडा, स्वप्निल देशमुख, सुधीर जोशी, रजत काळे, मयूर लांडे, युवराज चरखा, राजकुमार मालपाणी, संकेत टवानी, पवन लड्डा, भरत जोशी पटेल, जीवन घोलप, विशाल लांडे, रजत खंडेलवाल, महेश बियाणी, अभिजीत दोडे आदींनी सहभाग घेतला.

### ९ वर्षाच्या स्वराज ने १० किलोमीटर दौड पूर्ण केली



अवघ्या नऊ वर्षाच्या स्वराज जीवन घोलप याने अभिवादन दौडमध्ये सहभाग नोंदवत १० किलोमीटरचे अंतर पूर्ण करून महापुरुषांना अभिवादन केले. त्याबद्दल त्याचे मोरया रनर्स ग्रुप तर्फे अभिनंदन करण्यात आले.

दै.बीड सुपरफास्ट
www.beedsuperfast.com
शुक्रवार दि. १७ एप्रिल, २०२६ पान- ४
Happy Morning




# शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून आर्थिक प्रगती साधावी - आ. विजयसिंह पंडित

## गेवराईत खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक व ग्राम कृषी संजीवनी कार्यशाळा संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

पारंपारीक पिक पध्दतीमध्ये बदल करून शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत नगदी पिके, नफ्याची उत्पादने, फळबागा, भाजीपाला यांसह रेशीम शेतीसारखे अभिनव प्रयोग करून आर्थिक प्रगती साधावी, शासनाच्या पोखरासह इतर योजनांचा लाभ सामान्य शेतकऱ्यांना मिळावा यासाठी कृषी विभागाने जनजागृती करावी, खते आणि बि-बीयाणे यांचा अवैध साठा करून चढ्या भावाने विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी असे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत गेवराई येथे खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक व ग्राम कृषी संजीवनी कार्यशाळा संपन्न झाली.



यावेळी कृषी, महसुल व पंचायत विभागाचे अधिकारी, पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेवराई तालुकास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० अंतर्गत ग्राम कृषी संजीवनी कार्यशाळा सोमवार, दि.१३ एप्रिल रोजी अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात संपन्न झाली. यावेळी आ. विजयसिंह पंडित, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, खरेदीविक्री संघाचे अध्यक्ष » पान २ वर

# बीड जिल्ह्याला 'ऑरेंज अलर्ट'

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यावर पुन्हा एकदा अवकाळी पावसाचे संकट घोंगावत असून हवामान विभागाने गुरुवार आणि शुक्रवारी 'ऑरेंज अलर्ट' जाहीर केला आहे. या काळात ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता असून विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होऊ शकतो. मागील काही दिवसांपासून वाढलेल्या उकाड्यानंतर हा बदल होणार असला तरी, शेतकऱ्यांसाठी ही चिंतेची बाब आहे. वादळामुळे कच्ची घरे, पत्र्यांचे शेड आणि झाडांना धोका निर्माण होऊ शकतो. हवामान खात्याने नागरिकांना पाऊस सुरू असताना झाडाखाली किंवा मोकळ्या जागेत थांबणे टाळण्याचे आवाहन केले आहे. तसेच बाजार समित्यांमध्ये शेतमाल आणणाऱ्या शेतकऱ्यांनी ताडपत्री व संरक्षणाची योग्य व्यवस्था करावी, अशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. शनिवारी पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# मुस्लिम आरक्षण 'एल्गार' मोर्चाला जाहीर पाठिंबा

## राष्ट्रवादीचे जिल्हा युवक अध्यक्ष बळीराम गवते यांचे पत्र

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्यातील मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी आरक्षणाची मागणी अत्यंत न्याय्य असून, या मागणीसाठी १७ एप्रिल २०२६ रोजी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या 'आरक्षण एल्गार मोर्चाला' जाहिर पाठिंबा असल्याचे अधिकृत पत्र राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी 'सकल मुस्लिम आरक्षण कृती समिती'ला दिले आहे. पत्रात म्हटले आहे, मुस्लिम समाजातील मागास व वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. समाजाला समान संधी उपलब्ध करून देणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर, सकल मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या वतीने १७ एप्रिल रोजी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनाची दखल घेत बळीराम गवते यांनी म्हटले आहे, मुस्लिम समाजाच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाने तातडीने आणि सकारात्मक दृष्टीने पाहून ठोस निर्णय घेणे अपेक्षित आहे. लोकशाही मार्गाने आणि शांततामय पद्धतीने आयोजित करण्यात आलेला हा मोर्चा शासनाचे लक्ष वेधून घेण्यास यशस्वी ठरेल. या न्याय्य लढ्याला राष्ट्रवादी काँग्रेसचा पूर्णत: पाठिंबा आहे. या पाठिंब्यामुळे १७ एप्रिल रोजी निघणाऱ्या मोर्चाला मोठी ताकद मिळाली असून, जिल्ह्यात राजकीय आणि सामाजिक वर्तुळात या निर्णयाचे स्वागत होत आहे.

# मुस्लिम आरक्षण मोर्चाला आरक्षण संघर्ष समितीचा सशर्थ पाठिंबा

## संयोजकाने आपली राजकिय भुमिका स्पष्ट करावी-ॲड. प्रा. इलियास इनामदार

**बीड । प्रतिनिधी**



येत्या १७ एप्रिल रोजी निघणाऱ्या मुस्लिम आरक्षण मोर्चाला महाराष्ट्र मुस्लिम आरक्षण संघर्ष समिती व लोकसेना संघटनेने काही अटींवर पाठिंबा जाहीर केला असून, मुस्लिम आरक्षण समितीचे पदाधिकारी, आरक्षणप्रेमी, लोकसेना संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच बीड जिल्ह्यातील जनतेला महाराष्ट्र मुस्लिम आरक्षण संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष तथा लोकसेना संघटना प्रमुख ड. प्रा. इलियास इनामदार यांनी आपल्या हक्काच्या लढाईमध्ये बहुसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

हे आंदोलन मागण्या मान्य होईपर्यंत निरंतर सुरू राहावे. अन्यथा, मागील काही वर्षांपूर्वी काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारच्या काळात भाजपाच्या इशाऱ्यावर मुस्लिम आरक्षण आंदोलन राज्यभर पेटवून पाशा पटेल नामक नेत्याने समाजाची दिशाभूल केली होती. त्यामुळे राज्यातील मुस्लिम समाजाच्या मनात आघाडी शासनाविरोधात चीड » पान २ वर



बीड -भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना अशोक सुखवसे, धनंजय शेंडगे, शिवाजी नवले, सचिन काळे, विलास वाघमारे,अनिरुद्ध खडकीकर

# मुस्लिम आरक्षणाच्या मागणीला माजी जि.प.सदस्य नारायण शिंदे यांचा पाठिंबा

**नेकनुर । प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील राज्यात मुस्लिम समाजाला शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात न्याय हक्क मिळावेत,या प्रमुख मागणीसाठी बीड येथे १७ एप्रिल रोजी होणाऱ्या भव्य मुस्लिम आरक्षण मोर्चा चे आयोजन करण्यात आले आहे.या मोर्चाला नेकनुर चे माजी जिल्हा परिषद सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष नारायण बप्पा शिंदे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. नारायण शिंदे यांनी सांगितले की, मुस्लिम समाज शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला असून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची गरज आहे. या मागणीसाठी होणारे आंदोलन हे लोकशाही मार्गाने असून, शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी त्यांनी मागणी केली. तसेच, या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन मुस्लिम समाजाच्या हक्कासाठी आवाज उठवावा, असे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले आहे. या पार्श्वभूमीवर १७ एप्रिल रोजी होणाऱ्या आंदोलनाकडे सर्वांचे लक्ष लागले असून, स्थानिक पातळीवर तयारीला वेग आला आहे.तर या मुस्लिम आरक्षण मोर्चा साठी महाराष्ट्रातून मुस्लिम समाज बीडमध्ये दाखल होत आहे महाराष्ट्र शासनाने या मोर्चाकडे लक्ष देऊन मुस्लिम आरक्षण दिला पाहिजे अशी ही मागणी नेकनूर चे माजी जिल्हा परिषद सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष नारायण बप्पा शिंदे यांनी केली आहे.

# चेक बाऊन्स प्रकरणातील आरोपीस तीन लाख दंड व सहा महिने कारावासाची शिक्षा : ॲड.गणेश हनुमंत तावरे



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील ९ वे अतिरिक्त मुख्य दंडाधिकारी वैभव.सी.जोशी साहेब यांनी आरोपीस कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रमेंन्ट ॲक्ट अन्वय निकाल देऊन तीन लाख रुपयाचा दंड करून सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे.घटनेची हकीकत अशी की,आरोपी शुभम नारायण खटाणे यांनी फिर्यादी छ.द.गाडेकर यांच्या कडून आरोपीच्या घरगुती,वैयक्तिक अडचणी निवारण्या करिता व गुत्तेदारीतील कामाला हात ऊसने म्हणून रक्कम रुपये ३,००,०००/-(अक्षरी रुपये तीन लाख) ची मागणी दिनांक ०९/१०/२०२३ रोजी केली त्या प्रमाणे फिर्यादी ने शेतीतून मिळणारे उत्पन्न आणि निवृत्ती वेतनातून जवळ असलेली रक्कम आरोपीस काही रक्कम कॅश,फोन पे द्वारे दिली सदरची रक्कम

फिर्यादीने सहा महिन्यांच्या कालावधीसाठी आरोपीला दिले व फिर्यादीने दिनांक १०/०४/२०२४ रोजी आरोपीकडे सदर रकमेची मागणी केली असता.आरोपीने फिर्यादीला रु. ३०,०००/- रोख दिले व उर्वरित २,७०,००० रु चा धनादेश फिर्यादीला कोटक महिंद्रा बँक शाखा जिरेवाडी, बीड चा धनादेश » पान २ वर

# मुस्लिम आरक्षण मोर्चाला मोठ्या सख्येने उपस्थित रहा- शेख अनिस

## हा फक्त लढा नाही तर येणाऱ्या भविष्याचा वेध असेल

**बीड । प्रतिनिधी**



मुस्लिम समाजाच्या ५ टक्के आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाच्या निषेधार्थ दिनांक १७ एप्रिल शुक्रवार रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित केलेल्या आरक्षण एल्गार मोर्चास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते शेख अनिस यांनी केले आहे

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक. सामाजिक व आर्थिक व न्याय हक्कांसाठी सुरू असलेल्या या लढ्याला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या वतीने आयोजित या मोर्चाची जोरदार तयारी सुरू आहे. यावेळी आयोजकांनी सांगितले की, शिक्षण, नोकरी व सामाजिक न्यायासाठी मुस्लिम समाजाला आरक्षण मिळणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे १७ तारखेला होणाऱ्या या मोर्चात युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.समाजातील सर्व घटकांनी एकजुटीने १७ तारखेला होणाऱ्या या भव्य मोर्चात सहभागी होऊन आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा, असे आवाहन मुस्लिम आरक्षण कृती समितीकडून करण्यात आले आहे.

# मुस्लिम आरक्षण मोर्चास मोठ्या संखेने उपस्थित रहावे : अलाउद्दीन शेख

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमधील मुस्लिम समाजासाठी चे पाच टक्के आरक्षण रद्द करण्याच्या महायुती सरकारच्या निर्णयाविरोधात १७ एप्रिल रोजी बीडमध्ये भव्य मोर्चा सकल मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला आहे, देवेंद्र फडणवीस सरकारने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिमांसाठी पाच टक्के आरक्षण रद्द केले होते हे आरक्षण २०१४ च्या कायद्यान्वये देण्यात आले होते, ज्याला आधीच कायदेशीर स्थगिती देण्यात आली होती, परंतु सध्याच्या सरकारने ते पाच टक्के आरक्षण रद्द केले होते! राज्य सरकारने रद्द केलेल्या पाच टक्के मुस्लिम आरक्षणाच्या निर्णयाविरोधात तीव्र संताप व्यक्त करत, राज्यभर व्यापक आंदोलन उभारण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. तसेच बीड येथे १७ एप्रिल रोजी मुस्लिम आरक्षण कृती समितीने मोठ्या ताकतीने किल्ला मैदान ते जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे भव्य एल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी सर्व समाज बांधवांनी मोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे सामाजिक कार्यकर्ते अलाउद्दीन शेख यांनी केले आहे.

# मुस्लिम आरक्षण मोर्चास जयहिंद लोकचळवळचा जाहीर पाठिंबा

**बीड । प्रतिनिधी**

जयहिंद लोकचळवळ, बीड जिल्हाच्या वतीने दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी बीड येथे आयोजित मुस्लिम आरक्षण मोर्चास जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष श्रीकृष्ण नाईकवाडे यांनी दिली. मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षणाची मागणी योग्य व न्याय्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुस्लिम समाजातील मागास व वंचित घटकांना समान संधी मिळण्यासाठी शासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. लोकशाही व शांततामय मार्गाने आयोजित हा मोर्चा शासनाचे लक्ष वेधून घेईल व न्याय्य मागण्यांची पूर्तता होईल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.


दैनिक बीड सुपरफास्ट हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक अतुल शंकरराव जाधव यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स ॲण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य) येथून छापून, दैनिक बीड सुपरफास्ट कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५२३ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. संपादकः अतुल शंकरराव जाधव
Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE: NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN-431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV